# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- २/एनजीसी/मान्यता/२०१९/ ७५२८
दिनांक : 20 NOV 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय, शासन अनुदानित व
विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

विषय: तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख क्षेत्रात [Emerging Areas] नवीन पदवी अभ्यासक्रमाबाबत...

संदर्भ :अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एआयसीटीई/एबी/डब्ल्युआर/ईओटी/२०१९-२०, दि. १३.११.२०१९

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत तंत्रज्ञानाच्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस, इंटरनेट ऑफ थिंग्स (आईओटी), रोबोटिक्स, सायबर सिक्युरिटी, ब्लॉक चेन, क्वांटम इंजीनियरिंग, डेटा सायंसेस / बिग डेटा & ॲनालिटिक्स, ३ डी प्रिंटिंग & डिजाइन व ऑग्युमेंटेड रिॲलिटी / व्हर्चअल रिॲलिटी या ९ उदयोन्मुख तथा उभरत्या क्षेत्रात (Emerging Areas) पदवी अभ्यासक्रमाची नावे सुचविण्याकरीता कार्यगट [Working Group] नियुक्त करण्यात आला. सदर कार्यगटाच्या शिफारशीच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी "Artificial Intelligence & Data Science (AI & DS)" हा पदवी अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याबाबत मान्यता दिल्याचे संदर्भीन पत्रान्वये कळविले आहे. यास्तव संदर्भाधीन पत्र माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदर पत्रात नमूद केल्यानुसार ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मधील अटी व शर्ती, भौतिक तथा पायाभूत सोयीसुविधा, अध्यापक व इतर आवश्यक बाबींची पुर्तता करणा-या व सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास इच्छुक असलेल्या संस्थानी पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच संस्थानी प्रस्तुत अभ्यासक्रम सुरु करण्यास परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयास दि. १५ जानेवारी, २०२० पर्यंत उपलब्ध करुन द्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैचि/2019/ 3458
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 21 NOV 2019

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार आपली संस्था तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख क्षेत्रात (Emerging Areas) नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात इच्छुक असल्यास AICTE च पोर्टलवर Apporval Process Handbook नुसार अर्ज करावा व त्याबाबत दि. 31/12/2019 पर्यंत या कार्यालयास कळवावे.

(डॉ. राम निबुदे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर